महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

**क्रमांक : व्यशिप्र-२०२२/आस्था-२/प्र.क्र.७१/पदभरती/का-४** **दि.१०/०६/२०२४**

## परिपत्रक क्र.५१

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील विविध शासकीय संस्था/कार्यालयातील गट-क संवर्गातील विविध पदे भरण्याकरिता जाहिरात क्र.१/२०२२ व २/२०२२ जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.

सदर जाहिरातींच्या अनुषंगाने निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) पदाचा आक्षेप हाताळणी निकाल घोषित करणे, गुणवत्ता यादी घोषित करणे व उपरोक्त दोन्ही जाहिरातींच्या अनुषंगाने निवड सूची प्रसिद्ध करणे तसेच उमेदवारांच्या प्रमाणपत्र/कागदपत्रांची पडताळणी करुन पात्र उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे. तथापि, लोकसभा निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने राज्यात दिनांक १६/०३/२०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने प्रशासकीय कारणास्तव सदर कार्यवाही करणे शक्य झाले नाही.

लोकसभा निवडणूक-२०२४ बाबतचा निकाल दि.०४/०६/२०२४ रोजी घोषित झाला असून त्या अनुषंगाने असलेली आचार संहिता Election Commission of India, New Delhi यांच्या दि.०६/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये समाप्त करण्यात आली आहे. त्यामुळे ज्या उमेदवारांच्या प्रमाणपत्र/कागदपत्रांची संबंधित प्राधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष पडताळणी झालेली आहे, त्यापैकी प्रत्यक्ष पडताळणीअंती पात्र उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही मुंबई व नाशिक वगळता उर्वरित प्रादेशिक विभाग स्तरावरुन सुरु करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत २ पदवीधर तसेच २ शिक्षक मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूका-२०२४ च्या अनुषंगाने मुंबई पदवीधर मतदारसंघ, कोकण विभाग पदवीधर मतदारसंघ, नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघ व मुंबई शिक्षक मतदासंघात दि.२४/०५/२०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झालेली असल्याने मुंबई व नाशिक या प्रादेशिक विभागात सदर कार्यवाही करण्यावर अद्यापही निर्बंध आहेत.

सदर आदर्श आचारसंहितेत पदभरतीबाबतची उपरोक्त कार्यवाही करण्यास मान्यता देण्याकरिता शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्या अनुषंगाने मान्यता प्राप्त झाल्यास अथवा आदर्श आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर यापैकी जे अगोदर घडेल त्यानंतर तात्काळ पदभरती संदर्भातील पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

तरी संबंधित सर्व उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

Anil Gotiram Gavit

Digitally signed by Anil Gotiram Gavit
DN: CN = Anil Gotiram Gavit, C = IN, S = Maharashtra, O = DIRECTOR OF VOCATIONAL EDUCATION AND TRAINING MS, OU = DIRECTOR OF VOCATIONAL EDUCATION AND TRAINING
Reason: I am approving this document
Date: 2024.06.10 17:01:02 +05'30'

(अ. गो. गावीत)

सहसंचालक,

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.